# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ४४३ - २३ दिनांक : - २८/१२/२०२३

## ३१ डिसेंबर बंदोबस्ताकरिता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस सज्ज दारु पिवुन गाडी चालवणाऱ्यानो सावधान.

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षाचे स्वागतासाठी नागरिक मोठया प्रमाणावर ३१ डिसेंबर रात्री जल्लोष साजरा करीत असतात.त्याकरीता बरेच नागरिक रात्री उशीरा रस्त्यावर येत असल्याने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय क्षेत्रामध्ये मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली बंदोबस्त व नाकाबंदीचे आयोजन करण्यात येणार आहे.

सर्व पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात स्थानिक ३ पोलीस उप आयुक्त,७ सहा पोलीस आयुक्त, २०० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी व ५०० पेक्षा अंमलदार, २ दंगा नियंत्रण पथके, होमगार्ड व ४०० मसुब कर्मचारी यांचा योग्य तो बंदोबस्त संबंधीत पोलीस उपआयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली लावण्यात आलेला आहे.

तसेच ३१ डिसेंबर रोजी रात्री बरेच नागरिक दारु पिवुन गाडी चालवित असतात तसेच वाहतुकीचे नियाकडे दुर्लक्ष करीत असतात त्याकरीता वाहतुक विभागाचे १ पोलीस उप आयुक्त,१ सहा.पोलीस आयुक्त, १४ पोलीस अधिकारी, १९२ पोलीस अमंलदार व २४८ ट्रफिक वार्डन यांचा अतिरिक्त बंदोबस्त लावण्यात आला असुन त्यांचे मदतीने ठिकठिकाणी नाकाबंदी चे आयोजन करुन वाहनांची व दारु पिवुन गाडी चालविणावर बारकाईने लक्ष ठेवुन त्यांचेवर कारवई करण्यात येणार आहे. दारु पिवुन गाडी चालविणाऱ्या वाहन चालकांचाी तपासणी करण्यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेकडे एकुण १५ **Breath Analyzer** उपलब्ध असुन आयुक्तालयात ५० पेक्षा जास्त ठिकाणी नाकाबंदी आयोजन करण्यात येणार आहे.

मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली एकुण ५ पोलीस उपआयुक्त, १० सहा.पोलीस आयुक्त, २२५ पेक्षा जास्त पोलीस अधिकारी व ७०० पेक्षा जास्त पोलीस अंमलदार, २४८ ट्रफिक वार्डन व ४०० मसुब चे कर्मचारी असा बंदोबस्त नेमण्यात येणार आहे.

तसेच नागरिकांना काही अनुचीत प्रकार आढळल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे किंवा पोलीस आयुक्तालयाचे नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२२-३५००६१३०, २९४५२१३५ व ७०२१९९५३५२ या क्रमांकावर संपर्क साधण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

**----0000----**